# ● मूल्यमापन योजना
## शालेय श्रेणी अनिवार्य विषय

### १. आरोग्य व शारीरिक शिक्षण

आरोग्य व शारीरिक शिक्षण हा शालेय श्रेणीचा अनिवार्य विषय असून या विषयासाठी प्रचलित अभ्यासक्रमानुसार घटक निहाय भारांश देऊन क्षमता निश्चित कराव्यात. लेखी परीक्षा घेऊ नये. निश्चित केलेल्या क्षमतांनुसार प्रथम सत्र व व्दितीय सत्रात स्वतंत्रप्रणे प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ घेऊन मूल्यमापन करावे.

**वार्षिक निकाल पत्रक**

प्रथम सत्र + व्दितीय सत्र = एकूण

१०० + १०० = २००

वार्षिक निकालपत्रक तयार करताना प्रथम सत्रातील गुण, व्दितीय सत्रातील गुण एकत्र करून सरासरी नुसार त्या गुणांचे श्रेणीत रुपांतर करावे. ती श्रेणी विदयार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रकात दर्शवण्यात यावी.

### २. स्व-विकास व कलारसास्वाद

स्व – विकास व कलारसास्वाद या विषयाचे मूल्यमापन करताना खालील बाबींचा विचार करावा.

पाठ्यपुस्तकात प्रकरण निहाय मूल्यमापन आराखडा दिलेला आहे. लेखी परीक्षा घेऊ नये.
प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी मूल्यमापन आराखडयामध्ये काही निकष दिलेले आहेत. त्या निकषांनुसार (शिक्षकांच्या नोंदी व मुलांची नोंदवही यावरून) गुणदान करावे.
वार्षिक निकालपत्रक तयार करताना प्रथम सत्रातील गुण, व्दितीय सत्रातील गुण एकत्र करून त्या गुणांचे श्रेणीत रुपांतर करावे. ती श्रेणी विदयार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रकात दर्शवण्यात यावी.

- प्रथम सत्र (प्रकरण १ ते ४) – ५० गुण
- व्दितीय सत्र (प्रकरण ५ ते ९) – ५० गुण

| अ.क्र | विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र (५०) | व्दितीय सत्र (५०) | एकूण १०० | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

## • शालेय श्रेणी वैकल्पिक विषय

संरक्षणशास्त्र/एम.सी.सी (फक्त इयत्ता ९ वी)/स्काऊट गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा / एन.सी.सी यापैकी कोणताही **एक** विषय शाळेने आपल्या सोयीनुसार निवडावा.

### मूल्यमापन योजना

**(अ) संरक्षणशास्त्र**

या विषयाचे मूल्यमापन करताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात –

(१) या विषयासाठी लेखी परीक्षा नाही.

(२) संरक्षणशास्त्र कार्यपुस्तिकेत दिलेल्या लेखी कामासाठी ४०% भारांश आणि कृती/प्रात्यक्षिक चर्चा, क्षेत्रभेट, भूमिकाभिनय, संग्रह यासाठी ६०% भारांश ठेवण्यात आला आहे.

(३) स्थानिक उपलब्ध परिस्थितीनुसार – निर्धारित उपक्रमासोबत इतर उपक्रमाचेही आयोजन करण्यास हरकत नाही. तथापि निर्धारित उपक्रम घेणे आवश्यक आहे.

संरक्षणशास्त्र इयत्ता ९ वी च्या कार्यपुस्तिकेत दिलेल्या उपक्रमांची सर्वसाधारण विभागणी पुढीलप्रमाणे आहे –

(अ) लेखीकामावर आधारित उपक्रम

(ब) कृती कार्यावर आधारित उपक्रम (उदा. चर्चा, क्षेत्रभेट, मुलाखती, अभिनयाद्वारे विविध भूमिकांचे सादरीकरण भूमिकाभिनय, इंटरनेटचा वापर, चित्रे, कात्रणे, यांचा संग्रह, नकाशावाचन, आराखडा तयार करणे इत्यादी.)

विद्यार्थ्यांनी केलेल्या लेखी आणि कृती कार्याचे मूल्यमापन करताना सर्वसाधारणपणे पुढील निकष वापरावेत–

**(अ) लेखीकामावर आधारित उपक्रम** (उदा.............तुमच्या शब्दांत लिहा.)

(१) उपक्रमाची मांडणी

(२) घटक निहाय आलेले मुद्दे

(३) वापरलेले संदर्भ, साहित्य, पुस्तके, इंटरनेट इत्यादी.

(४) मुद्दयांची क्रमबद्ध मांडणी

(५) स्वत:चे मत, विचार, स्पष्टता

(६) लेखनाची सुरुवात, मध्य, शेवट, लेखनाची शैली, तांत्रिक बाबी या निकषाचा विचार करावा.

**(ब) कृतीकार्य –** क्षेत्रभेट, भूमिकाभिनय, मुलाखती, आराखडा तयार करणे, नकाशावाचन, कात्रणे इत्यादी. साठी

(१) कृतीत स्वत:हून सहभाग घेणे.

(२) कृतीतील सहजता, सातत्य, उत्स्फूर्तपणा इत्यादी.

(३) कृतीचा मुद्देसूद अहवाल लिहिणे.

(४) क्षेत्रभेट – संबंधित व्यक्ती, संस्था यांची मान्यता, भेटीचे नियोजन, भेटीनंतर संबंधितांना आभार पत्र पाठवणे इत्यादी .

(५) मुलाखतीसाठी पूर्व तयारी, प्रत्यक्ष मुलाखत, आभार इत्यादी निकषांचा विचार करावा.

**(क) संकलित मूल्यमापन –** प्रथम व व्दितीय सत्रातील मूल्यमापन स्वतंत्रपणे करावे व त्यानुसार वर्षाअखेरीस दिलेल्या सारणीनुसार संकलित गुणपत्रक तयार करावे.

**विषय : संरक्षणशास्त्र**

**इयत्ता : नववी** **तुकडी :**

| अ.क्र | विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र | | | व्दितीय सत्र | | | एकूण (अ+ब) | सरासरी अ+ब / २ | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लेखी काम | उपक्रमातील प्रत्यक्ष सहभाग | एकूण (अ) | लेखी काम | उपक्रमातील प्रत्यक्ष सहभाग | एकूण (ब) | | | |
| | | (४०) | (६०) | (१००) | (४०) | (६०) | (१००) | २०० | १०० | |
| | | | | | | | | | | |

**(ब) एम.सी.सी (इयत्ता ९ वी साठी)**

वैकल्पिक गटातील शालेय श्रेणीच्या विषयांपैकी एम.सी.सी हा विषय फक्त इयत्ता ९ वी साठीच राहील. एम.सी.सी हा विषय विद्यार्थ्यांना ऐच्छिक स्वरुपाचा परंतू माध्यमिक शाळांना मात्र अनिवार्य राहील. संबंधित विदयार्थ्यांना महाराष्ट्र छात्र सेना या विषयाचे प्रमाणपत्र शाळेमार्फतच देण्यात येईल

प्रात्यक्षिक व नोंदवहीचे गुण एकत्र करुन प्रथम सत्र व व्दितीय सत्रात १०० गुणांपैकी गुणदान करावे. प्रत्येक सत्रात मिळालेल्या २०० गुणांचे रुपांतर १०० गुणात करुन त्यानुसार श्रेणी दयावी. लेखी परीक्षा घेऊ नये.

(क) **स्काऊट गाईड**

स्काऊट गाईड या विषयासाठी महाराष्ट्र स्काऊट गाईड संस्थेने निर्धारित केलेला पाठ्यक्रम व मूल्यमापन पध्दती नुसार मूल्यमापन करावे. विद्यार्थ्यांच्या अंतिम निकाल पत्रकात श्रेणी दर्शविण्यात यावी.

**(ड) नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा**

नागरी संरक्षण व वाहतूक संरक्षा या विषयासाठी प्रचलित अभ्यासक्रमानुसार क्षमता निश्चित कराव्यात. क्षमता निश्चित करताना विद्यार्थ्याचा वयोगट, पूर्वज्ञान, आकलनक्षमता या बाबींचा विचार करावा. लेखन कार्यासाठी स्वतंत्र २०० पानी वही करावी. त्यामध्ये चित्रे, आकृत्या, तात्विक माहिती, नामनिर्देशित आकृत्या, वैशिष्टपूर्ण नोंदी इत्यादी यांचा समावेश असावा.

प्रात्यक्षिक परीक्षा व नोंदवही असे प्रत्येकी ५० गुण देऊन प्रत्येक सत्रात स्वतंत्रपणे मूल्यमापन करावे. अंतिम निकालपत्रकात २०० गुणांचे रुपांतर १०० गुणात करुन श्रेणी द्यावी. लेखी परीक्षा घेऊ नये.

**(इ) एन. सी. सी**

या विषयाची कार्यवाही केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या प्रचलित पध्दतीप्रमाणे लागू राहील. विद्यार्थ्यांच्या अंतिम निकाल पत्रकात श्रेणी दर्शविण्यात यावी.

## श्रेणी तक्ता

| अ. क्र. | मिळालेले गुण (टक्के) | श्रेणी |
|---|---|---|
| १. | ६० % व त्यापेक्षा अधिक | अ |
| २. | ४५ % व त्यापेक्षा अधिक परंतु ६० % पेक्षा कमी. | ब |
| ३. | ३५ % व त्यापेक्षा अधिक परंतु ४५% पेक्षा कमी. | क |
| ४. | ३५ % पेक्षा कमी गुण | ड |